'रोऊँ मैं सागर के किनारे, सागर हँसी उडाए...
क्या जाने ये चंचल लहरे मैं हूँ आग छुपाए...'

सी. एच. आत्मानामे सैगलवेड्या तरुण गायकाने हुबेहुब तशीच नक्कल करीत गीतकार शैलेन्द्रचे हे शब्द आळवले आणि दुसऱ्याच क्षणी तो लोकप्रियतेच्या शिखरावर जाऊन बसला. अर्थात त्याआधी त्यानेच गायलेल्या नि ओ. पी. नय्यरने दिलेल्या 'प्रीतम आन मिलो' या गैरफिल्मी गीताची जबरदस्त पुण्याई त्याच्या पाठीशी होतीच. किंबहुना ते ऐकूनच निर्माते दलसुख एम. पंचोली कमालीचे भारावले होते. त्यांनी सी. एच. आत्माला मोठ्या आदराने आपल्या 'नगीना' चित्रपटात पार्श्वगायनाची सर्वप्रथम संधी दिली. या सैगलभक्ताने त्या संधीचा पुरेपूर फायदा मिळवला. खरेतर संगीतकार शंकर जयकिशनच्या टिपिकल शैलीहून सर्वस्वी भिन्न असलेले हे सोलो. शिवाय त्याच चित्रपटात सी. एच. आत्माची इतरही गाणी असताना रसिक प्रेक्षकांनी मात्र 'रोऊँ मैं सागर के किनारे'ला भरभरून दाद दिली आणि ते हायलाइट ठरले.

पंचोलीनिर्मित नासीर खान-नूतनचा हा 'नगीना' आजच्या पिढीला तसा अज्ञातच. कारण रिपिट रनला तो फारसा कुठे लागलाही नाही. पण जुनेजाणते रसिक मात्र आज पन्नास वर्षानंतरही या 'नगीना'ची आवर्जून दखल घेताना दिसतात. रहस्यमयपटाची चांगली हाताळणी करणारा दिग्दर्शक म्हणून रवींद्र दवेनी १९४५ साली पंचोलीच्या 'धमकी' चित्रपटाद्वारे सिद्ध करून दाखवले होतेच. म्हणून या खेपेसही तशाच पठडीतला 'नगीना' पंचोलींनी या दिग्दर्शकाला सुपूर्द केला. खलप्रवृत्तीचा रायसाहब (बिपिन गुप्ता) ही गावातली बडी असामी. त्याचा मित्र श्यामलाल चौधरी. या श्यामलालकडे नागमणी (नगीना) असलेली एक मौल्यवान अंगठी असते आणि त्यावर रायसाहेबाचा डोळा असतो. आपल्या मित्राचा स्वभाव ओळखून असलेल्या श्यामलालला खरेतर ती अंगठी रायसाहेबाच्या साध्वी पत्नीला द्यायची असते. पण ऐन वेळी श्यामलाल खऱ्या अंगठीऐवजी तशीच दिसणारी नकली अंगठी रायसाहेबाला देतो. श्यामलालने आपली फसवणूक केल्याचे लक्षात येताच दुष्ट रायसाहेब खवळतो आणि त्याला पिस्तुलाने टिपायला पाहतो. पण नेमकी रायसाहेबाची पत्नीच श्यामलालच्या आडवी येते नि चुकून तिलाच गोळी लागते. घाव वर्मी बसल्यामुळे तात्काळ तिचा मृत्यू होतो. हा खून श्यामलाल समक्षच घडल्यामुळे तो आता पोलिसांना वर्दी देईल म्हणून बिथरलेला

जीवन कंठत असताना इकडे त्याचा मुलगा श्रीनाथ (नासीर खान) तारुण्यात प्रवेश करतो आणि आपल्या आईच्या सांगण्यावरून वडिलांचा शोध घेण्यासाठी तो रायसाहेबाच्या गावी येण्यास निघतो. ट्रेनमध्ये त्याची भेट मुक्ता (नूतन)बरोबर होते. ही मुक्ता रायसाहेबाचीच मुलगी असते नि तीसुद्धा वडिलांना भेटण्यास गावी निघालेली. अर्थात श्रीनाथला या गोष्टीची कल्पना नसते.

गावात पोहोचल्यावर त्याच रात्री श्रीनाथ त्या पडक्या वाड्यात आपल्या वडिलांच्या शोधार्थ जातो. तिथल्या भयाण आणि नीरव शांततेत कुणाच्या तरी विव्हळण्याचा आवाज श्रीनाथच्या कानी पडतो. श्रीनाथ त्या आवाजाच्या दिशेने वेध घेत असतानाच अचानक दुष्ट रायसाहब तिथे येतो आणि त्याला पाहून 'तू कोण, कुठला?' अशी चौकशी करतो. श्रीनाथ त्या आवाजाविषयी विचारणा करताच 'माझा नोकर आजारी आहे', अशी रायसाहेब त्याची बोळवण करतो. तेव्हा श्रीनाथही 'मी डॉक्टर आहे' अशी

उपस्थित असलेल्या आपल्या 'गुंगा' नामक बलदंड गुंडाला 'श्रीनाथला मारून टाक' असा हुकूम देतो. श्रीनाथच्या लक्षात ते येते आणि शिताफीने तो त्या पडक्या वाड्यातून निसटतो. पण या कामात त्याला एका अदृश्य स्त्रीचे सहकार्य लाभते. तीच त्याला आपला उजवा हात कोपरापर्यंत दृश्य स्वरूपात दाखवून बाहेर जाण्याचा रस्ता दाखवते.

दुसऱ्या रात्रीही श्रीनाथ पुन्हा त्या वाड्यावर जातो तेव्हा ती अदृश्य स्त्री म्हणजे त्याला ट्रेनमध्ये भेटलेली रायसाहेबाची मुलगी मुक्ता असल्याचे कळते. कारण आता ती दृश्य स्वरूपात त्याच्या समोर येते. श्रीनाथ तिला आपला येण्याचे प्रयोजन सांगून तळघरातून कोणाचा आवाज येतोय त्याचा शोध घेण्यास सांगतो. मुक्ताही त्याला सहकार्य करण्याचे आश्वासन देते. त्यानुसार मुक्ता मग तळघरात कोण आहे ते पाहावयास जाते तर तिला साखळदंडांनी जखडलेला एक वृद्ध दिसतो. ती त्याची चौकशी करणार तोच रायसाहब तिथे पोहोचतो.

केली तर आपल्या वडिलांना पोलीस कैदेत टाकतील याचीही तिला कल्पना येते. विचारांनी सैरभैर झालेली मुक्ता श्रीनाथला भेटायला जाते खरी, पण या गोष्टीची वाच्यता ती श्रीनाथकडे करणार असा अचूक अंदाज आलेला धूर्त रायसाहब त्या दोघांना एकत्र रंगेहाथ पकडतो आणि मुक्ताने त्याला काही सांगू नये म्हणून वरकरणी खूश झाल्याचे नाटक करीत त्या दोघांच्या प्रेमाला मान्यता दर्शवतो. शिवाय त्यांना शहरात परत जा असेही सांगतो. श्रीनाथ आणि मुक्ता शहरात जायला ट्रेनमधून प्रवास करीत असतानाच दुष्ट रायसाहब तिथेही टपकतो नि मुक्ताच्या नकळत श्रीनाथला धावत्या ट्रेनमधून ढकलून देतो आणि मुक्ताला घेऊन आपल्या हवेलीवर परततो.

इकडे रायसाहेबाचा मॅनेजर निहाल (हीरालाल) त्या वृद्ध कैद्याला नि गुंगाला आपल्या ताब्यात घेऊन अज्ञात स्थळी बंदिस्त करतो. कारण त्याला मुक्ताबरोबर लग्न करण्याची इच्छा असते. हवेलीवर आल्यावर रायसाहेबाला ही गोष्ट कळताच तो निहालकडे येऊन त्या वृद्ध

नगीना

रोऊँ मैं सागर के किनारे, सागर हँसी उडाए...



बॅनर : पंचोली प्रॉडक्शन्स. **निर्माता :** दलसुख एम. पंचोली. **दिग्दर्शक :** रवींद्र दवे. **गीतकार :** शैलेन्द्र, हसरत जयपुरी,
संगीत : शंकर जयकिशन. **कलाकार :** नूतन, नासीर खान, बिपिन गुप्ता, हिरालाल मोहना, गोप, श्यामलाल, मायकल.
प्रदर्शन : शुक्रवार १८ मे १९५१.
गीते :
१) माय माय डिअर, ओ ओ डिअर, ओ मम्मी नही, डॅडी नही... - रफी/ शमशाद बेगम. गीतकार शैलेन्द्र.
२) तूने हाय मेरे जख्मे जिगर को छू लिया... लता...
३) कैसी खुशी की है रात, बलम मेरे साथ... लता/ हसरत
४) रोऊँ मैं सागर के किनारे... सी. एच. आत्मा/शैलेन्द्र.
५) हम से कोई प्यार करे जी... हैलो एक बार करे जी... रफी/ लता...
६) याद आयी है वेकसी छायी है... लता/ हसरत
७) इक सितारा है आकाश में इक सितारा.. सी. एच. आत्मा/ शैलेन्द्र.
८) तुमको अपनी जिंदगी का... दिल बेकरार है मेरा... सी. एच. आत्मा/ हसरत.

वेळी रायसाहेब शब्द फिरवील म्हणून रायसाहेबालाही कैद करतो. आता त्याला रायसाहेबाची संपत्तीही हवी असते.

मुक्ता आता एकाकी पडते. कारण तिला श्रीनाथही हयात नसल्याचं सांगण्यात येतं. परिणामी मुक्ताला निहालच्या इशाऱ्यानुसार वागण्याशिवाय पर्याय नसतो. शिवाय तिला त्या वृद्ध कैद्याचीही सुटका करायची असते. श्रीनाथला ठार मारण्यासाठी रायसाहेबाने जरी ट्रेनमधून ढकलून दिलेलं असलं तरी तो नेमका पाण्यात पडतो आणि पोहत किनाऱ्याला येऊन पुन्हा गावात परततो. तिथं रायसाहेब आणि मुक्ता दोघंही गायब असल्याचं त्याला कळतं. शिवाय गावकऱ्यांनी तो पडका वाडाही पाडलेला असतो. श्रीनाथ मग निहालचा शोध घेतो. दोघांची झटापट होऊन निहाल पळ काढतो तेव्हा मुक्ता त्याचा पाठलाग करून त्याने त्या वृद्ध कैद्याला नि वडिलांना कुठं ठेवलंय ते पाहाते आणि त्या वृद्धाची सर्वप्रथम सुटका करते. दरम्यान गुंगाही मोकाट सुटतो आणि कावेबाज निहालला उंच मनोऱ्यावरून फेकून देतो. तोपर्यंत श्रीनाथही तिथं पोहोचतो. आता फक्त रायसाहेबच कैदेत असतो. श्रीनाथ त्याची माणुसकीला जागून सुटका करतो खरी, पण दुष्ट रायसाहेब श्रीनाथलाच तिथल्याच खोल पडक्या विहिरीत बंदिस्त करून टाकतो आणि मुक्ताकडे येतो. तिच्यासोबत त्या वृद्ध कैद्याला पाहताच त्याचं पित्त खवळतं आणि चिडलेला रायसाहेब त्याला हवेलीत कोंडून ती सगळी हवेलीच पेटवून देतो.

आपल्या पोरीला घेऊन त्या हवेलीपासून दूर पळून जाताना मुक्ताच आपल्या नीच वृत्तीच्या बापाचा हात सोडून त्या वृद्धाला वाचवायला जळत्या हवेलीत प्रवेश करते आणि त्याची सुटका करते. इकडे रायसाहेबाच्या अत्याचाराने खवळलेले गावकरी हातात पेटत्या मशाली घेऊन रायसाहेबावर चाल करून जातात. तेव्हा जीव वाचविण्यासाठी त्या जळत्या हवेलीत शिरण्याव्यतिरिक्त त्याच्याकडे दुसरा मार्गच नसतो. रायसाहेब जळून मरतो. मग श्रीनाथ स्वत:ची विहिरीतून सुटका करून तिथं येतो आणि हवेलीत अडकलेल्या मुक्ताची सुटका करून तिला बाहेर आणतो. बाहेर तो वृद्ध कैदी त्या दोघांची वाटच बघत असतो. तोच श्रीनाथचा बारा वर्षे बेपत्ता असलेला बाप श्यामलाल असल्याचे निष्पन्न होतं. दोघे बापलेक एकत्र येतात आणि श्रीनाथचे मुक्ताबरोबर शुभमंगल होते.

दिग्दर्शक रवींद्र दवेंनी 'नगीना'ची हाताळणी वेधक पद्धतीने केली होती. भयाण पडका वाडा, नायिकेचा तिथला सुरुवातीचा गूढरम्य वातावरणनिर्मितीसाठी पार्श्वभूमिला केलेला 'तूने हाय मेरे जख्मे जिगर...' या लताच्या गाण्याचा कल्पक वापर. परिणामी निर्माण होणारा थरार प्रेक्षकांना चांगलाच जाणवायचा. म्हणूनच तर सेन्सॉरने 'नगीना'ला 'फक्त प्रौढांसाठी'चं सर्टिफिकेट दिले होते. या चित्रपटाची आणखीही एक आठवण म्हणजे नायिका नूतन त्यावेळी अठरा वर्षांचीही नसल्यामुळे तिलाही हा चित्रपट थिएटरमध्ये पाहावयास मिळाला नव्हता.

संगीतकार शंकर-जयकिशननी दिलेली 'नगीना'ची सगळीच गाणी छान होती. विशेषत: वडिलांकडून प्रेमाला प्रोत्साहन मिळताच नायिकेने म्हटलेलं 'कैसी खुशी की है रात' आणि प्रियकराच्या मृत्यूच्या बातमीने व्यथित झाल्यावरच 'याद आयी है...' ही लताची परस्पर भिन्न मूडची दोन्ही सोलोज अप्रतिमच. पण 'नगीना' खऱ्या अर्थाने आठवणीत राहिला तो सी. एच. आत्माच्या गाण्यामुळे. म्हणूनच पंचोलींनी आपल्या पुढच्या 'आसमान'मध्ये 'प्रीतम आन मिलो' देणाऱ्या ओ. पी. आणि सी. एच. आत्माला एकत्र आणलं. शिवाय 'भाईसाहब'मध्ये तर त्यालाच नायक बनवून सगळी गाणी गायची संधी दिली. त्यातलं 'नजरने कह दिया अफसाना मेरे प्यार का...' विसरणं शक्य आहे का? शिवाय 'ढाके की मलमल'मधलं 'दिया तो जला...' आणि गेलाबाजार रामलालने दिलेलं 'मंडवे तले गरीब के...' (गीत गाया पत्थरोंने). पण 'रोऊँ मैं...'ची उंची त्याच्या कुठल्याच गीताला लाभली नाही. इतर गायकांनी सैगल शैली सोडून स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली नि ते यशस्वी ठरले. सी. एच. आत्मा मात्र आयुष्यभर त्याच चाकोरीत फिरत राहिला. म्हणून तो झपाट्याने मागे पडला. पार्श्वगायनाच्या ऑफर्स बंद झाल्यावर उपजीविकेसाठी तो ठिकठिकाणी आपल्या गाण्यांचे जाहीर कार्यक्रम करायचा. तेव्हा त्याला सर्वप्रथम 'रोऊँ मैं सागर के किनारे...' चीच फर्माईश केली जायची. ते गाणं त्याने इतक्या वेळा श्रोत्यांना ऐकवलं की पुढे त्याचा त्यालाच उबग आला होता. इतरत्र कुठं काम नसल्यामुळे नैराश्याने त्याला ग्रासले होते. असंच एकदा कुठल्याशा ठिकाणी त्याच्या गाण्याचा कार्यक्रम होता. तेव्हा तो वास्तव्याला ज्या ठिकाणी राहायचा तो फ्लॅटही नेमका समुद्राच्या किनारीच होता. पडदा वर गेला आणि सी. एच. आत्माने स्टेजवर एन्ट्री घेतली. टाळ्यांच्या कडकडाटात श्रोत्यांमधून 'रोऊं मै...'ची फर्माईश आली तेव्हा ते गायला सुरुवात करण्यापूर्वी प्रचंड उद्वेगाने तो म्हणाला होता, 'बीस साल से सागर के किनारे वाले फ्लैट में रो ही रहा हूँ, लीजिए आप चाहते